# ई - पोलीस पत्रिका

दि. २७/०८/२०२४ अनु.क्र.१५५

## (अमरावती शहर पोलीसांची २०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीसदल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचे ताब्यातून पळून जाऊ नयेत.
- "सुरक्षित व सुखकर अमरावती" हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

# पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## प्रशिक्षण

**१.पोआअ/पशा-१/MIA/विशेष प्रशिक्षण/७२८६/२०२४ अमरावती शहर दिनांक १२/०८/२०२४**

**संदर्भ :-** आयुक्त, राज्य गुप्तवार्ता विभाग, म. रा. मुंबई यांचे पत्र जा. क्र. प्रशासन/पो.नि. प्रशिक्षण/ २०२४ /२५५९ दि. ०८.०८.२०२४.

**विषय :-** विशेष शाखा/जिल्हा विशेष शाखा(पोलीस आयुक्तालय/पोलीस अधिक्षक कार्यालय) येथील पोलीस निरीक्षक यांचेसाठी विशेष प्रशिक्षण आयोजित करण्यात आल्याबाबत.

## आदेश

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे येथे **विशेष शाखा/जिल्हा विशेष शाखा (पोलीस आयुक्तालय/पोलीस अधिक्षक कार्यालय) येथील पोलीस निरीक्षक यांचेसाठी विशेष प्रशिक्षण**आयोजित केलेले आहे. सदरचे प्रशिक्षणाकरीता अमरावती शहर पोलीस घटकातुन खालिल नमुद अधिकारी यांचीनिवड करण्यात येत आहे.

| प्रशिक्षण केंद्राचे नाव | प्रशिक्षण दिनांक | अधिका-याचे नांवे | नेमणुक |
|---|---|---|---|
| महाराष्ट्र गुप्तवार्ता प्रबोधिनी, पुणे | २०.०८.२०२४ ते २१.०८.२०२४ | श्री. प्रविण वांगे पोलीस निरीक्षक | विशेष शाखा, अमरावती शहर |

**प्रशिक्षण केंद्रात जाण्यापुर्वी त्याबाबतचे नियम व अटी खालील प्रमाणे :-**

१. उपरोक्त पोलीस अधिकारी यांनी UNIFORM, I-CARD, SPORTS DRESS, SPORT SHOES, RELIEVING MEMOइत्यादी साहित्य सोबत नेणे आवश्यक आहे.

२. उशिरा पोहचणा-या अधिका-यांना प्रशिक्षणास ॲडमिशन मिळणार नाही व त्यांना परत करण्यात येईल. तसेच प्रशिक्षणा दरम्यान कोणतेही रजा किंवा परवानगी मिळणार नाही.

३. उपरोक्त प्रशिक्षणार्थीनी वैद्यकीय आपतकालीन परिस्थितीकरीता महाराष्ट्र कुटूंब कल्याण आरोग्य योजना कार्ड सोबत नेणे आवश्यक आहे.

**२.पोआअ/पशा-१/MPA/MCOCA/७४१५/२०२४ अमरावती शहर दिनांक १४/०८/२०२४**

**संदर्भ :-** अपर पोलीस महासंचालक तथा संचालक, महाराष्ट्र पोलीस अकॅडमी, नाशिक यांचे पत्र क्र. मपोअ/प्रशि-५ /सेवा.प्रशि/२०२३-६१७८ दिनांक ०६.०८.२०२४

**विषय :-**महाराष्ट्र पोलीस अॅकॅडमी, नाशिक येथे सेवांतर्गत प्रशिक्षण आयोजित केलेबाबत.

## आदेश

उपरोक्त संदर्भांकीत विषयान्वये कळविण्यात येते की, अमरावती शहर पोलीस घटकातुन खालिल नमुद पोलीस अधिकारी यांची त्यांचे नावासमोर दिलेल्या प्रशिक्षणाकरीता निवड करण्यात येत आहे.

| Sr. no. | NAME OF COURSE | PLACE AND PERIOD | NAME OF OFFICER& POSTING | RANK | MOBILE NO | E-MAIL ID | SEVAARTH NO |
|---|---|---|---|---|---|---|---|
| 1 | Maharashtra Control of Organised Crime Act (MCOCA) | MAHARASHTRA POLICE ACADEMY NASHIK **21.08.2024 to 23.08.2024** | JAYDATTA BHAVAR ACP-RAJAPETH | ACP | 9130606689 | jaydattabhawar@gmail.com | STDJBBM9001 |
| | | | BABARAO AVCHAR CRIME BRANCH | PI | 9527584610 | babaraoavchar1978@gmail.com | DGPBDAM7801 |

उपरोक्त प्रशिक्षणाकरीता **प्रशिक्षण शुल्क प्रत्येकी रु. ६०००/- अक्षरी- (रुपये- सहा हजार फक्त)** आकारण्यात आलेला आहे. सदर प्रशिक्षण शुल्क प्रशिक्षण निधी मधुन मंजुर करण्यात येत आहे. **परंतू प्रशिक्षण निधी शिल्लक नसल्याने सदर प्रशिक्षण शुल्क हे प्रशिक्षण अनुदान प्राप्त होताच संबंधीत प्रशिक्षण केंद्रास अदा करण्यात येईल.**

**प्रशिक्षण केंद्रात जाण्यापुर्वी त्या बाबतचे नियम व अटी खालील प्रमाणे :-**

१.पोलीस अधिकारी यांनी प्रशिक्षण सुरु होण्यापुर्वी एक दिवस अगोदर रोजी १७.०० वाजे पर्यंत महाराष्ट्र पोलीस अॅकॅडमी, नाशिक येथे हजर रहावे.

२. प्रशिक्षणाकरीता फक्त प्रशिक्षणार्थीनी उपस्थित राहणे अपेक्षित आहे. सोबत पती/पत्नी किंवा लहान मुलांना घेवुन जावु नये.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## शिक्षा

**१.पोआअ/विचौ-१/अं.आ./पोहवा-११२७ शेखर गेडाम/७५५३/२०२४ अमरावती शहर दिनांक २१/०८/२०२४**

## आदेश

**संदर्भ :-** क्रं.पोआअ/विचौ-१/का.दा.नो./पोहवा-११२७ शेखर गेडाम/१०८८१/२०२१, दिनांक ३०/११/२०२१

**कसुरदाराचे नाव** :- पोहेकॉ/११२७ शेखर गणपतराव गेडाम, पोलीस मुख्यालय, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही पोहेकॉ/११२७ शेखर गणपतराव गेडाम, पो.स्टे. गाडगेनगर, अमरावती शहर येथे नेमणुकीस असतांना दिनांक १९/०५/२०२१ रोजी फिर्यादी नामे विवेक यादवराव कुंबलवार वय २६ वर्ष व्यवसाय सोनार दुकान, रा. लक्ष्मीनगर, कॉटन मार्केटच्या मागे, अमरावती यांनी दिनांक २४/३/२०२१ रोजी ॲन्टी करप्शन ब्युरो (ACB) अमरावती येथे पोनि श्री संतोष इंगळे यांचे कडे तक्रार नोंदविली की, फिर्यादी यांचे कुंबलवार ज्वेलर्स नावाचे सोन्याचे दुकान आहे आर्थिक अडचणीमुळे त्यांचे दुकान सध्या बंद आहे. २०२० मध्ये पो.स्टे. गाडगेनगर येथे दाखल असलेल्या चोरीच्या गुन्हयात नरेश समाधान भांगे याला पोलीस स्टेशन गाडगेनगर येथील डी.बी चे शेखर गेडाम यांनी पकडले होते. व नरेश भांगे यांचे कडुन फिर्यादीने चोरीचे सोने विकत घेतल्याबाबत तुम्ही फिर्यादीला चोरीचा गुन्हा दाखल झाल्यापासुन चोरीच्या गुन्हयात चोरी गेलेले माल विकत घेतल्या प्रकरणी आरोपी न करण्याबाबत वारंवार अंदाजे ३० ग्रॅम सोने किंवा ३० ग्रॅम सोन्याची किंमत एवढी रक्कम बाबत लाचेची मागणी करीत आहे. फिर्यादीस तुम्हाला लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ॲन्टी करप्शन ब्युरो (ACB) अमरावती येथे तुमच्यावर कायदेशीर कारवाई करण्यात यावी याबाबत तक्रार नोंदविली.

दिनांक २५/०३/२०२१ रोजी दुपारी ०२.५० वा ते ०३.४५ वा दरम्यान पोलीस स्टेशन गाडगे नगर चे मागील बाजुस असलेल्या डी.बी. रुमचे समोरील मोकळयात जागेत फिर्यादी व तुमच्यात प्रत्यक्ष भेटी दरम्यान झालेल्या संभाषणामध्ये तुम्ही फिर्यादी यांना पो.स्टे. गाडगे नगर येथे डिसेंबर २०२० मध्ये दाखल असलेल्या चोरीचा गुन्हयात अटक न करण्यासाठी तसेच कोणतेही कारवाई न करण्यासाठी तडजाडी अंती रु. ९०,०००/- लाचेची मागणी केली. फिर्यादीच्या लेखी तक्रारी वरुन पो.स्टे. गाडगेनगर येथे अप क्र. १५५७/२०२१ कलम ७ भ्रष्ट्राचार प्रतिबंधक अधिनियमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. तुम्ही स्वत:चा आर्थिक लाभ व्हावा याकरीता आपल्या पदाचा दुरुपयोग करुन कायदेशिर मोबदल्याशिवाय प्रलोभन म्हणुन तक्रारदारास लाचेची मागणी केली आहे. सदरची बाब अत्यंत गंभीर स्वरुपाची असुन शिस्तप्रिय पोलीस खात्यास अशोभनिय आहे. सदर कसुरी बाबत तुमची विभागीय चौकशी करण्यात आली. विभागीय चौकशी मध्ये तुम्ही खालील प्रमाणे कसूरी केल्याचे सिध्द झाले आहे.

तुमची विभागीय चौकशी सहाय्यक पोलीस आयुक्त, राजापेठ विभाग यांनी केली असता सदर विभागीय चौकशी अंती असे दिसून येते की, तुमचे विरुध्द तक्रारदार यांनी ॲन्टी करप्शन विभाग अमरावती येथे दिलेल्या लेखी तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कारवाईत दि. २५/०३/२०२१ रोजी पंचासमक्ष पडताळणी दरम्यान तुम्ही स्वत:चा आर्थिक लाभ व्हावा याकरीता आपल्या पदाचा गैरवापर करुन पो.स्टे. गाडगेनगर येथे दाखल असलेल्या गुन्हयात तक्रारदारास आरोपी न करण्यासाठी तडजोडीअंती ९०,०००/- रुपये लाचेची मागणी केल्याने सिध्द झाले आहे.

यावरुन तुम्ही तुमच्या कर्तव्यात दिरंगाई, बेजबाबदारपणा, संशयीतपणा, विपर्यास्त वर्तन करुन नैतीक अध:पतन केल्याने पोलीस विभागाची प्रतिमा जनसामान्य मध्ये मलीन केली असे निष्पन्न झाले आहे. तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तप्रिय खात्यात जबाबदार पदावर नेमणूकीस असतांना व तुम्हास कायद्याचे पुर्ण ज्ञान असतांना सुध्दा स्वत:च्या आर्थिक लाभाकरीता कर्तव्यात दिरंगाई, बेजबाबदारपणा करुन कसूरी केली आहे.

तुम्ही पोलीस खात्यात अत्यंत जबाबदार अशा पदावर काम करीत असून तुमचे वर्तन पोलीस खात्याचे दृष्टीने अत्यंत बेशिस्तपणाचे व अशोभनिय आहे. तसेच तुमच्या अशा कृत्यामुळे पोलीस खात्याची

प्रतिमा मलीन झाली आहे. तुमच्या कर्तव्याप्रती तुम्हाला कोणतेही गांभीर्य नाही. तुम्ही शिस्तबध्द पोलीस खात्याला न शोभणारे कृत्य करुन नैतिक अध:पतन केले आहे. तुमच्या बेशिस्तपणाचे व अशोभनिय वर्तणाबाबत तुम्हाला महाराष्ट्र पोलीस अधिनीयम १९५१ चे नियम २५ चे प्राधिकारान्वये तसेच महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम ३ (१) (२) चे तरतुदीनुसार **" शासकीय सेवेतुन काढून टाकण्याची शिक्षा का ? करण्यातयेवु नये "** म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक १/१२/२०२१ रोजी स्विकारुन त्यावर तुम्ही तुमचे स्पष्टीकरण सादर केले. तत्पुर्वी तुम्हास दिनांक १४/०८/२०२४ रोजी मा.पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात येवून तुमचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले असता ते समाधानकारक दिसून आले नाही, परंतु तुम्हांस पुढील कर्तव्यात सुधारण्याची एक संधी देण्यात येत असुन कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेल्या प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त कसुरी प्रकरणी पोहवा/११२७ शेखर गणपतराव गेडाम,, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ १ (एक) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखण्याची शिक्षा देण्यांत येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने २ प्रतित अपिल अर्ज सादर करु शकता.

**२.पोआअ/विचौ-१/अं.आ./मनापोशि-२११ कविता शिरसाठ/७५८७/२०२४ अमरावती शहर दि. २२/०८/२०२४**

## आदेश

**संदर्भ :-** पोआअ/विचौ-१/का.दा.नो./मनापोशि-२११ कविता शिरसाठ/६२६८/२०२२, दिनांक ०७/०६/२०२४

**कसुरदाराचे नाव** :- मनापोशि-२११ कविता राहूल शिरसाठ, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर

**थोडक्यात कसुर :-**

तुम्ही मनापोशि/२११ कविता राहूल शिरसाट, महिला सहायता कक्ष, पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर येथे नेमणूकीस असतांना दिनांक ३०/०९/२०२१ रोजी तक्रारदार अमोल सुरेशराव थोरात, रा. सिध्दार्थ नगर, शासकीय निकेतन कॉलेजचे मागे, सिव्हील लाईन पोस्ट शिवाजी, अमरावती यांना त्यांचे विरुध्द महिला सहायता कक्ष, पोलीस आयुक्त कार्यालय, अमरावती शहर येथे त्यांचे पत्नीने दिलेली तक्रार ही नागपूर येथे ट्रान्सफर न करण्याकरीता व सहकार्य करण्याकरीता १०,०००/- रुपये लाचेची मागणी केली. सदर तक्रारीची दिनांक ०१/१०/२०२१ रोजी पंचासमक्ष पडताळणी केली असता त्यांनी तक्रारदार यांना तडजोडी अंती ४०००/- रु. लाचेची मागणी करुन सदर रक्कम स्विकारण्याचे मान्य केले. परंतु त्यांना तक्रारदार यांचेवर संशय आल्याने त्यांनी लाच रक्कम स्विकारली नाही.

तुम्ही तुमच्या पदाच्या अनुषंगाने असलेले काम लोकसेवक म्हणून कोणत्याही व्यक्तीचे काम पार पाडणे आवश्यक असतांना कायदेशिर परिश्रमीके शिवाय इतर कोणत्याही प्रकारचे पारितोषणाची स्वत:साठी लाचेची मागणी केली. तुमचे सदरचे कृत्य कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८ प्रमाणे

होत असल्याने तुमचे विरुध्द दिनांक ३०/११/२०२१ चे २०.२५ वा. पो.स्टे. फ्रेजरपूरा येथे अप.क्र. १८७९/२०२१ कलम ७ भ्रष्टाचार प्रतिबंधक अधिनियम १९८८अन्वये गुन्हा दाखल करण्यांत आला आहे. दिनांक ०१/१२/२०२१ चे १०.३० वा. अटक करण्यांत आली होती.

तुमच्या सदर कसूराबाबत विभागीय चौकशी केली असता अर्जदार सौ. स्नेहा अमोल थोरात रा. नागपूर यांनी दिलेल्या अर्जाची तात्काळ चौकशी करुन वरिष्ठांना नियमाप्रमाणे अहवाल सादर करणे आवश्यक होते. परंतू तुम्हास असलेल्या शासकीय अधिकाराचा गैरवापर करुन गैरअर्जदार अमोल सुरेश थोरात यांचेशी स्वत:चे मोबाईल फोन वरुन संपर्क साधून आर्थिक लाभापोटी पैशाची मागणी केली व अर्जदाराची तक्रार त्वरीत निकाली काढण्याकडे जाणीव पुर्वक दुर्लेक्ष केले आहे. सदर बाब कसूरदार यांचे घेतलेले जाबजबाब व केलेल्या विभागीय चौकशी मध्ये निष्पन्न झाले आहे.

महाराष्ट्र शासनाने कौटूंबिक वाद विवाद आपसी समझोत्याने निकाली काढता यावे यादृष्टीने महिला सहाय्य कक्षाची स्थापना केली असून जनतेला महिला सहाय्य कक्षाबाबत आत्मविश्वास असल्याने कौटूंबिक वादविवादाची प्रकरणे समोपचाराने मीटविण्याचे दृष्टीने महिला सहाय्य कक्षाकडे हस्तांतरीत केले जातात. महिला सहाय्य कक्ष यांचे माध्यमातून बरेच कौटूंबिक प्रकरणाचा निपटारा होवून दोन कुटूंबे संसार आनंदाने जगत आहे. त्यामुळे महिला सहाय्यक कक्षाबाबत जनतेमध्ये विश्वासाचे स्थान आहे. परंतू तुम्ही महिला सहाय्य कक्ष येथे कार्यरत असतांना तुमच्याकडे असलेल्या अधिकाराचा गैरवापर करुन समुपदेशन करीता असलेल्या तक्रार अर्जाचे अनुषंगाने आर्थिक मागणी केल्याने पोलीस प्रशासनाशी संबंधीत असलेल्या महिला सहाय्य कक्षाबाबत अविश्वासाची भावना निर्माण झाली आहे. तुम्ही तक्रारदार अमोल सुरेश थोरात यांना वारंवार फोन करणे. महिला सहाय्य कक्ष कार्यालय सोडून कार्यालयीन वेळेत तक्रारीचे संबंधीत व्यक्तींना बाहेर बोलावून भेटणे ही बाब पोलीस विभागाचे दृष्टीने अत्यंत बेशिस्तपणाची व पोलीस विभागाची प्रतिमा मलिन करणारे गैरकायदेशिर कृत्य केल्याचे विभागीय चौकशीत सिध्द झाले आहे. तुम्ही पोलीस खात्यासारख्या शिस्तप्रिय खात्यात जबाबदार पदावर नेमणूकीस असतांना व तुम्हास कायद्याचे पुर्ण ज्ञान असतांना सुध्दा स्वत:च्या आर्थिक लाभाकरीता कर्तव्यात गैरवर्तणा सारखे कृत्य केले आहे.

तुम्ही पोलीस खात्यात अत्यंत जबाबदार अशा पदावर काम करीत असून तुमचे वर्तन पोलीस खात्याचे दृष्टीने अत्यंत बेशिस्तपणाचे व अशोभनिय आहे. तसेच तुमच्या अशा कृत्यामुळे पोलीस खात्याची प्रतिमा मलीन झाली आहे. तुमच्या कर्तव्याप्रती तुम्हाला कोणतेही गांभीर्य नाही. तुम्ही शिस्तबध्द पोलीस खात्याला न शोभणारे कृत्य करुन नैतिक अध:पतन केले आहे. तुमच्या बेशिस्तपणाचे व अशोभनिय वर्तणाबाबत तुम्हाला महाराष्ट्र पोलीस अधिनीयम १९५१ चे नियम २५ चे प्राधिकारान्वये तसेच महाराष्ट्र पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम ३ (१) (२) चे तरतुदीनुसार **" शासकीय सेवेतुन काढून टाकण्याची शिक्षा का ? करण्यातयेवु नये "** म्हणुन कारणे दाखवा नोटीस देण्यात आली. सदर नोटीस तुम्ही दिनांक ०८/०६/२०२२ रोजी स्विकारुन त्यावर तुम्ही तुमचे स्पष्टीकरण सादर केले. तत्पुर्वी तुम्हास दिनांक १४/०८/२०२४ रोजी मा. पोलीस आयुक्त यांचे आज्ञांकित कक्षेत समक्ष बोलविण्यात येवून तुमचे म्हणणे ऐकूण घेण्यात आले असता ते समाधानकारक दिसून आले नाही, परंतु तुम्हांस पुढील कर्तव्यात सुधारण्याची एक संधी देण्यात येत असुन कारणे दाखवा नोटीस मध्ये देण्यात आलेल्या प्रस्तावित शिक्षेमध्ये अंशत: बदल करुन खालील प्रमाणे अंतिम आदेश निर्गमीत करण्यांत येत आहे.

## अंतिम आदेश

उपरोक्त कसुरी प्रकरणी मनापोशि-२११ कविता राहूल शिरसाठ, नेमणूक पोलीस मुख्यालय, अमरावती शहर, अमरावती शहर यांना मुंबई पोलीस (शिक्षा व अपील) १९५६ नियम क्रमांक ३ (२) (५) चे तरतुदी नुसार **पुढीलदेय वार्षीक वेतन वाढ १ (एक) वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखण्याची शिक्षा देण्यांत येत आहे.** उपरोक्त शिक्षेने कसुरदार व्यथित होत असल्यास सदर आदेश प्राप्त झाल्याचे तारखेपासुन ६० दिवसाच्या आत मा.अपर मुख्य सचिव, गृहविभाग, मंत्रालय, मुंबई यांना यथायोग्य मार्फतीने २ प्रतित अपिल अर्ज सादर करु शकता.

### भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चितीती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## निरंक

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस